# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक ३९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.२८ जानेवारी २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## शिवसेना खटल्याची सुनावणी; सुप्रीम कोर्टाने १८ फेब्रुवारीची तारीख केली निश्चित

नवी दिल्ली दि.२७ (वृत्तसंस्था)- महाराष्ट्रासह अवघ्या देशाचे लक्ष लागलेल्या शिवसेना पक्ष व धनुष्यबाण प्रकरणाच्या सुनावणीसाठी आता सर्वोच्च न्यायालयाने आता १८ फेब्रुवारी ही नवी तारीख दिली आहे. त्यामुळे आता या प्रकरणावर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीनंतरच सुनावणी होईल हे स्पष्ट झाले आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वातील खंडपीठाने शिवसेनेची सुनावणी २१ व २२ जानेवारी रोजी सलग २ दिवस घेण्याचे निश्चित केले होते. पण २१ तारखेला सुप्रीम कोर्टाने ऐनवेळी अरावली पर्वताचे प्रकरण हातावर घेतल्यामुळे या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नाही. त्या दिवशी या प्रकरणाची सुनावणी २३ जानेवारी रोजी होईल असे सांगण्यात येत होते. पण त्या दिवशीही हे प्रकरण बोर्डावर आले नाही. अखेर आज सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण १८ फेब्रुवारी रोजी सुनावणीसाठी हाती घेतले जाईल हे स्पष्ट केले आहे. सुप्रीम कोर्टाच्या संकेतस्थळावर ही तारीख नमूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने या प्रकरणाची सुनावणी ही निवडणूक प्रक्रिया पूर्ण होण्याअगोदर घेण्याची मागणी केली होती. पण कोर्टाने त्याकडे दुर्लक्ष करत ही सुनावणी या निवडणुकांचा निकाल घोषित झाल्यानंतर जवळपास १० दिवसांनी घेण्याचे निश्चित केले आहे.

# भारत आणि युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार कराराची घोषणा

## युरोपियन युनियनच्या अध्यक्षांकडून भारताचे कौतुक



नवी दिल्ली दि.२७ (वृत्तसंस्था)- भारत आणि युरोपियन युनियनमध्ये आज मुक्त व्यापार कराराची घोषणा करण्यात आली आहे. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील 'मदर ऑफ ऑल डील' या करारावर स्वाक्षरी करण्यात आल्याने भारतासाठी हा ऐतिहासिक निर्णय मानला जात आहे. भारत आणि युरोपियन युनियनमधील हा करार म्हणजे 'सर्व करारांची जननी' असल्याचा उल्लेख पंतप्रधान मोदींनी केला आहे.

भारत आणि युरोपियन युनियनमधील करारानंतर युरोपियन युनियनच्या अध्यक्षा उर्सुला व्हॉन डेर लेयेन यांनी भारताचं कौतुक केलं. तसेच भारताने केलेल्या प्रगतीमुळे युरोप खूप आनंदी असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. तसेच 'जेव्हा भारत यशस्वी होतो तेव्हा जग अधिक समृद्ध होतं', असं म्हणत उर्सुला व्हॉन डेर लेयेन यांनी भारताचं कौतुक केलं आणि भारत आणि युरोपियन युनियनमधील 'मदर ऑफ ऑल डील'चे फायदे सांगितले आहेत.

''आम्हाला मिळालेल्या आदरातिथ्याबद्दल भारताचे खूप खूप धन्यवाद. कालच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आम्ही भारताचे प्रमुख पाहुणे असणं हा आमच्यासाठी खूप मोठा सन्मान होता. ही एक आठवण आहे, जी आम्ही आयुष्यभर जपून ठेऊ. कारण सामंजस्याची भावना खूप शक्तिशाली असते. भारताने केलेल्या प्रगतीवर युरोप खूप आनंदी आहे, कारण जेव्हा भारत यशस्वी होतो तेव्हा जग अधिक स्थिर, अधिक समृद्ध, अधिक सुरक्षित होतं आणि त्याचा आपल्या सर्वांना फायदा होतो. युरोप आणि भारताने आज इतिहास घडवला आहे. कारण आतापर्यंतचा सर्वात मोठा करार झाला आहे आणि ही फक्त सुरुवात आहे. आम्ही आमचे धोरणात्मक संबंध आणखी मजबूत करू'', असं उर्सुला व्हॉन डेर लेयेन यांनी म्हटलं आहे.

**करार हा ऐतिहासिक क्षण, भारताला नवा मित्र मिळाला-नरेंद्र मोदी**

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील मुक्त व्यापार कराराची घोषणा करण्यात आली आहे. या डीलला आता मदर ऑफ ऑल डील म्हटलं जातेय. युरोपियन काऊन्सिलचे अध्यक्ष एंतोनियो लुईस सांतोस दा कोस्टा आणि युरोपियन कमिशनचे अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयेन आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत या कराराची घोषणा करण्यात आली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यांवेळी एंतोनियो लुईस सांतोस दा कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयेन यांचं स्वागत केलं. काल पहिल्यांदा युरोपियन युनियनचे नेते पहिल्यांदा भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले.आज आणखी एक ऐतिहासिक प्रसंग आहे, जगातील दोन मोठ्या लोकशाही शक्ती त्यांच्या संबंधात निर्णायक अध्यायाची सुरुवात करत आहेत. गेल्या काही वर्षात भारत आणि युरोपियन युनियनच्या संबंधांत वाढ झाली आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

भारत आणि युरोपियन यूनियन यांच्यात १८० अब्ज युरोचा व्यापार आहे. ८ लाखांपेक्षा अधिक भारतीय युरोपियन यूनियन देशात राहत आहेत. स्ट्रॅटेजिक टेक्नॉलॉजी,क्लीन एनर्जी, डिजिटल गव्हर्नन्स ते डेव्हलपमेंट पार्टनरशिपपर्यंत, प्रत्येक क्षेत्रात सहयोगाचे नवे मापदंड निर्माण केले आहेत. यासह आजच्या कराराद्वारे समाजाच्या सर्व वर्गांना लाभ पोहोचवणारे निर्णय घेतले आहेत,असं मोदी म्हणाले.

# मतदानापूर्वीच महायुतीचे २२ उमेदवार बिनविरोध

## झेडपी अन् पंचायत समितीला महापालिकेचा पॅटर्न

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे, १५ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितीच्या निवडणुकांमधील अंतिम लढतीचे चित्र स्पष्ट झाले असून आता प्रचाराचा धुरळा उडणार आहे. मात्र, तत्पूर्वीच काहींनी विजयाचा गुलाल उधळला. त्यामध्ये, कोकण अग्रेसर राहिला असून कोकणात महायुतीने विजयी खाते उघडले आहे. तळकोकणात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकी आधीच महायुतीचे तब्बल २१ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यात, रायगड जिल्ह्याच्या महाड पंचायत समिती निवडणुकीत सवाने धामणे गणातून उभे असलेले अनिल जाधव बिनविरोध आल्याने महायुतीचे एकूण २२ उमेदवार बिनविरोध झाले आहेत. त्यामुळे, सिंधुदुर्ग आणि रायगडमध्येही महायुतीने विजयाचा आनंद साजरा केला.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत भाजपने १९ तर शिंदे सेनेने २ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. जिल्हा परिषद मध्ये खारेपाटण जिल्हा परिषद उमेदवार प्राची इस्वालकर, बांदा जिल्हा परिषद उमेदवार प्रमोद कामत, पडेल जिल्हा परिषद उमेदवार सुयोगी घाडी, बापर्डे जिल्हा परिषद उमेदवार अवनी तेली, कोळपे जिल्हा परिषद उमेदवार प्रमोद रावराणे, किंजवडे जिल्हा परिषद उमेदवार सावी लोके या भाजपकडून बिनविरोध झाल्या आहेत. तर, जाणवली जिल्हा परिषद उमेदवार रुहिता तांबे या शिंदेंच्या शिवसेना उमेदवारही बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे, मतदानापूर्वीच या उमेदवारांनी विजयाचा गुलाल उधळला.

येथील पंचायत समितीमध्ये बिडवाडी पंचायत समिती संजना राणे, वरवडे पंचायत समिती सोनू सावंत, कोकीसरे पंचायत समिती साधना नकाशे, पडेल पंचायत समिती अंकुश ठूकरूल, नाडण पंचायत समिती गणेश राणे, बापर्डे पंचायत समिती संजना लाड, नाटळ पंचायत समिती सायली कृपाळ, नांदगाव पंचायत समिती हर्षदा वाळके, शिरगाव पंचायत समिती शीतल तावडे, फणसगाव पंचायत समिती समृद्धी चव्हाण, जाणवली पंचायत समिती महेश्वरी चव्हाण, आडवली मालडी पंचायत समिती सीमा परुळेकर, आसोली पंचायत समिती संकेत धुरी हे भाजपचे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. तर कोळझर पंचायत समितीमध्ये शिंदेंच्या शिवसेनेचे गणेशप्रसाद गवस उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यात उबाठा सेनेच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने हे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. दोडामार्ग तालुक्यातील कोलझर पंचायत समिती महायुतीचे उमेदवार गणेशप्रसाद गवस बिनविरोध. ठाकरे शिवसेनेचे प्रवीण परब यांनी माघार घेतल्याने गणेशप्रसाद गवस निवडून आले आहेत. गवस हे शिंदेंच्या शिवसेनेचे दोडामार्ग तालुकाप्रमुख म्हणून काम पाहत असून कोलझर पंचायत समितीमधून ते बिनविरोध निवडून आले आहेत.

# मुंबई ते नवी मुंबई विमानतळ जोडण्यासाठी मेट्रो ८ मार्गाला राज्य मंत्रीमंडळाची मान्यता

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- मुंबईला नवी मुंबईशी जोडण्याकरता मेट्रो ८ ला मान्यता देण्यात आली आहे. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. तसंच, समृद्धी महामार्गाच्या विस्तारित कामास गती देण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मेट्रो लाईन ८ जोडणीस मान्यता देण्यात आली असून या कामासाठी भूसंपादनासह विविध मंजुरीची कामे पुढील सहा महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मेट्रो मार्गाची एकुण लांबी ३५ किलोमीटर असणार आहे. त्यापैकी भूमिगत मार्ग ९.२५ किलोमीटर तर उन्नत मार्ग २४.६३६ किमी असणार आहे. या मार्गात एकूण २० स्थानके असणार असून ६ स्थानके भूमिगत तर १४ स्थानके उन्नत असणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ स्थानक ते घाटकोपर पूर्वपर्यंत भूमिगत स्थानके असणार असून घाटकोपर पश्चिम स्थानक ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ स्थानकापर्यंत उन्नत स्थानके असणार आहेत. दोन स्थानकांतील सरासरी अंतर १.९ किलोमीटर असणार असून ३०.७ हेक्टर भूसंपादनाची आवश्यकता आहे. भूसंपादनासाठी ३८८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी एकुण २२ हजार ८६२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा प्रकल्प पुढच्या तीन वर्षांत पूर्ण करण्याचे ठरविले असून प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच सर्व परवानगी प्राप्त करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव यांच्यावर शाईफेक

बारामती दि.२७ (प्रतिनिधी)- बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव यांच्यावर शाईफेक केल्याची घटना आज सकाळी घडली. नगर परिषदेच्या वतीने आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा न लावल्याने आंबेडकरी अनुयायी आक्रमक झाले होते. नगराध्यक्षांनी दिलगिरी व्यक्त करण्याची अपेक्षा असताना, त्यांनी ती केल्याने संतप्त झालेल्या आंबेडकरी अनुयायांनी नगराध्यक्ष सचिन सातव यांच्यावर शाईफेक केली. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून नगर परिषद परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त बारामती नगर परिषदेत ध्वजवंदनाच कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात महात्मा गांधी यांची प्रतिमा लावण्यात आली होती. मात्र, ज्या संविधानामुळे प्रजासत्ताक दिन साजरा होतो, त्या संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा कार्यक्रमात कोठेही दिसली नाही. प्रशासनाच्या या कृतीला अवमान मानत कार्यकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

# माथेफिरूने ट्यूशनला जाणाऱ्या २ मुलींना विहिरीत फेकले

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी)- एका माथेफिरू तरुणाने खासगी शिकवणीला जाणाऱ्या २ अल्पवयीन विद्यार्थिनींना विहिरीत फेकून दिल्याची भयंकर घटना जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यात घडली आहे. सदर तरुणाने या मुलींना विहिरीत का फेकले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण पोलिसांनी आरोपी तरुणाला ताब्यात घेतले आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, भुसावळ तालुक्यातील साकरी गावात ही घटना घडली आहे. रोहन चौधरी असे आरोपी माथेफिरू तरुणाचे नाव आहे. पीडित मुली इयत्ता ९ वीच्या विद्यार्थिनी आहेत. त्या मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे गावातून खासगी शिकवणीसाठी जात होत्या. त्या गावाजवळील एका शेतालगत पोहोचल्या असता तिथे दबा धरून बसलेल्या आरोपीने या दोघींवर हल्ला केला. त्याने त्यांना पकडून एका विहिरीजवळ नेले. त्यानंतर त्यांना पकडून विहिरीत फेकून दिले. हा प्रकार घडत असताना मुलींनी जिवाच्या आकांताने आरडाओरडा केला.

त्यांचा आरडाओरडा ऐकूण दुसऱ्या एका शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. त्यानी हातातील काम सोडून त्यांच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी गावातही ही गोष्ट कळवली. त्यानंतर गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ मुलींना दोरखंड व शिडीच्या मदतीने विहिरीबाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू केला. हे वृत्त लिहीपर्यंतही त्यांचा प्रयत्न सुरू होता.

दुसरीकडे, या घटनेची माहिती मिळताच भुसावळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी आरोपी रोहन चौधरी याला ताब्यात घेतले आहे. ते त्याची कसून चौकशी करत आहेत. सदर तरुणाने मुलींना विहिरीत फेकण्याचे विकृत पाऊल का उचलले? हे अद्याप समजले नाही. पण हे प्रकरण जुन्या वादातून घडले का की एकतर्फी प्रेम किंवा इतर कारणांतून घडली? आदी सर्वच अंगाने या प्रकरणाचा तपास केला जात आहे.

# जिल्हा परिषद निवडणुकानंतर सातारा गॅझेट लागू होणार; मंत्रालयातील बैठकीत मराठा आरक्षणवर चर्चा

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- राज्यात मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियरच्या निर्णयानुसार मराठवाड्यातील अनेक मराठा बांधवांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळण्यासही सुरुवात झाली आहे. मात्र, मराठा आंदोलक उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावेळी राज्य सरकारने हैदराबाद आणि सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भातील त्यांच्या मागण्या मान्य केल्या होत्या. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियर लागू झाले पण सातारा गॅझेटियर कधी लागू होणार? असा प्रश्न मराठा बांधवांना पडला आहे. सातारा गॅझेटियरचा लाभ साताऱ्यासह पश्चिम महाराष्ट्रातील मराठा बांधवांना होणार असल्याने या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आता, यासंदर्भात महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. मराठा आरक्षण उपसमितीची आज मंत्रालयात बैठक संपन्न झाली, उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात या बैठकीत सातारा गॅझेटियरवर प्रामुख्याने चर्चा झाली. तसेच, हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणी आणि मराठा आरक्षण विषयावर आढावा घेण्यात आला. त्यानुसार, राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकांनंतर सातारा गॅझेटियर लागू करण्यात येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. जिल्हा परिषद निवडणुकीनंतर सातारा गॅजेट लागू करण्यासंदर्भात निर्णय होण्याची शक्यता असल्याची सूत्रांची माहिती आहे.

# लाडकी बहीणचे पैसे लवकरात लवकर द्या, जळगावात लाडक्या बहिणी आक्रमक

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी)- महायुती सरकारला महाराष्ट्रात पुन्हा सत्ता मिळवून देण्यात महत्त्वाची ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आता महिलांच्या असंतोषाला कारणीभूत ठरत आहे. भंडारा, बुलढाणा आणि वाशिमनंतर जळगावात लाडक्या बहिणी आक्रमक झाल्या आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये मिळत नसल्यानं शेकडो महिलांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. लाडक्या बहिणींनी जळगावच्या महिला आणि बाल विकास कल्याण केंद्रात धडक दिली. या महिलांनी लाडकी बहीण योजनेचे पैसे लवकरात लवकर द्यावेत, अशी भूमिका घेतली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे मिळत नसल्याने शेकडो संतप्त महिला जळगावच्या महिला आणि बाल विकास कल्याण केंद्रात घुसल्या आहेत. लवकरात लवकर आम्हाला लाडक्या बहीण योजनेचे पैसे देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. जळगाव जिल्ह्यामध्ये एकूण दहा लाखाहून अधिक महिला या लाडक्या बहीण योजनेस पात्र ठरल्या आहेत. मात्र, के वाय सी केल्याच्या नंतर एक लाखाहून अधिक महिलांच्या खात्यात पैसे जमा न झाल्याने या महिलांचा आज उद्रेक झाल्याचं पाहायला मिळत आहे. केवायसी करताना झालेल्या चुकांमुळे ही अडचण निर्माण झाल्याचं अधिकारी सांगत आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना ज्या अडचणी येत आहेत. या संदर्भात लाडक्या बहिणींनी १८१ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा, असं आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं होतं. मात्र, त्यानंतर अनेक महिलांनी हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा संपर्क होत नसल्याचं समोर आलं आहे.

# मी बाबासाहेबांच्या जयंतीला नाचतो, लेझीम खेळतो, काल अनावधानाने नाव राहिले-गिरीश महाजन

## जाहीर लेखी माफी मागावी; वनरक्षक माधवी जाधवांची एकच मागणी

नाशिक दि.२७ (प्रतिनिधी)- नाशिकमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मंत्री गिरीश महाजन यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख न केल्याने वाद निर्माण झाला. यावेळी वन विभागाच्या कर्मचारी माधवी जाधव यांनी जाहीरपणे आक्षेप घेत, ''मंत्री गिरीश महाजन यांनी भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव का घेतले नाही?'' असा थेट सवाल केला. या प्रश्नामुळे कार्यक्रमस्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेनंतर विरोधकांनी मंत्री गिरीश महाजन यांच्यावर जोरदार टीका केली आहे. तर वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी महाजन यांच्यावर अॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच गिरीश महाजन यांची राज्य मंत्रिमंडळातून ताबडतोब हकालपट्टी करा, अशी मागणी आनंदराज आंबेडकर यांनी केली आहे. आता यावर गिरीश महाजन यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

गिरीश महाजन म्हणाले की, कोणी काहीही मागणी करू शकतं, त्याबाबत काहीही दुमत नाही. मी काल देखील या गोष्टीचा खुलासा केलेला आहे. भाषण संपल्यानंतर मला दोन मिनिटात समजलं की, गोंधळ झाला. तो अनावधानाने झाला. मी दिलगिरी व्यक्त करतो. कोणाच्याही भावना दुखावण्याचा माझ्या मनात उद्देश नाही. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल मला नितांत आदर आहे.

मात्र, महाजन यांनी केवळ दिलगिरी व्यक्त न करता, जाहीर लेखी माफी मागावी, अशी मागणी आता माधवी जाधव यांनी केली आहे. मंत्री गिरीश महाजन यांनी दिलीगिरी व्यक्त केलीय, पण त्यांनी जाहीर लेखी माफी मागावी अशी मागणी वन विभागाच्या महिला पोलीस कर्मचारी माधवी जाधव यांनी केली आहे. गिरीश महाजन यांचे सुदैव आणि माझे दुर्दैव हे प्रकरण अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत बसत नाही. मात्र, मंत्री गिरीश महाजन यांनी हे जाणून बुजून केले आहे. कारण, आपल्या भाषणात त्यांनी इतर महापुरुषांची नावे घेतली, छत्रपती शिवाजी महाराज जे आमच्या हृदयात आहेत, छत्रपती संभाजी महाराज यांचेही त्यांनी नाव घेतले. मात्र, बाबासाहेबांचे नाव त्यांनी घेतले नाही, असा आरोप माधवी जाधव यांनी केला आहे.

तसेच, गिरीश महाजन यांनी दिलगिरी व्यक्त न करता लेखी माफी मागावी, त्यात आंबेडकर अनुयायी नागरिकांची माफी मागावी, असेही माधवी जाधव यांनी म्हटले. जोपर्यंत गिरीश महाजन माफी मागत नाहीत, तोपर्यंत मी माझ्या भूमिकेवर ठाम असणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

# १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कार्यक्रम; छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालय राज्यात दुसरे



छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले. या मूल्यमापनात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयात ई-गव्हर्नन्स उपक्रमांची नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्यात आली. विभागनिहाय सातत्यपूर्ण आढावा, ई-ऑफिसचा प्रभावी वापर तसेच नागरिक-केंद्रित निर्णय प्रक्रियेवर भर देण्यात आल्याने विभागाला हे यश मिळाले आहे.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जाहीर करण्यात आलेल्या या मूल्यमापनात कार्यालयाची वेबसाईट, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन तसेच उघए तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात झालेला वापर या सात निकषांवर कामगिरी तपासण्यात आली.

राज्यात दुसरा क्रमांक मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सर्व विभागप्रमुखांशी संवाद साधून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी अपर विभागीय आयुक्त प्रताप काळे, अपर विभागीय आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर आयुक्त रिता मेत्रेवार, उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे, अपर विभागीय आयुक्त मंजुषा मिसकर, सहआयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, सहआयुक्त राजेश काटकर, उप आयुक्त दादासाहेब वानखेडे, उपआयुक्त सुषमा देसाई, सहायक आयुक्त सरीता सुत्रावे, नगर प्रशासन विभागाचे देविदास टेकाळे, सहायक आयुक्त मंजुषा कापसे, महानगर नियोजनकार हर्षल बावीस्कर, जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी विद्याधर शेळके, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना विभागीय आयुक्त श्री. पापळकर म्हणाले की, १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमामुळे शासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि तंत्रज्ञानाधारित झाले आहे. ही कामगिरी विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असून, भविष्यातही प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा वापर सुरू ठेवला जाईल.

**धाराशिव व लातूर जिल्हाधिकारी कार्यालयांची निवड**

१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयांच्या कामगिरीचेही मूल्यमापन करण्यात आले. यामध्ये राज्यातील सर्वोत्कृष्ट पाच जिल्हाधिकारी कार्यालयांत धाराशिव व लातूर जिल्हाधिकारी कार्यालयांचा समावेश झाला आहे.

धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामगिरीची राज्य पातळीवर दखल घेण्यात आली आहे.

**सेवाकर्मी प्लस कार्यक्रमात ९ नगरपरिषदांची उत्कृष्ट कामगिरी**

प्रशासकीय सुधारणा अंतर्गत राबविण्यात आलेल्या १५० दिवसांच्या 'सेवाकर्मी प्लस' कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रगतीचे मूल्यांकन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत नगरपालिका गटात राज्यातील निवड झालेल्या १७ पैकी ९ नगरपालिका छत्रपती संभाजीनगर विभागातील आहेत. यामध्ये लातूर जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर, निलंगा व औसा, धाराशिव जिल्ह्यातील कळंब, तुळजापूर, लोहारा, नळदुर्ग तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड नगरपरिषदेचा समावेश आहे.

# तांदूळ निर्यातीला वेसण

भारताशी चाललेले शुल्क युद्ध, रशियाकडून भारत करत असलेली कच्च्या तेलाची आयात आणि त्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचा अलीकडेच झालेला भारत दौरा या घटनांनी हवालदिल झालेल्या अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी आता भारताच्या तांदूळ निर्यातीला वेसण घालण्याची नवी खेळी केली आहे. त्याद्वारे त्यांनी भारताला एका नवीन मुद्द्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे.

भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, ज्याला व्यापकपणे शुल्क युद्ध म्हटले जाते, तो काळ २०१९ मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. १ ऑगस्ट २०१९ पासून अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून २७ ऑगस्ट २०१९ रोजी अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्त्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरीत्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.

ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की, भारताला अमेरिकेत तांदळाचे 'डंपिंग' करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने तांदळाचे डंपिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल. काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डंपिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर आधारित आहे. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत.

ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक टॅरिफ लादले असूनही भारत अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करतो, हे नक्कीच भूषणावह आहे. अमेरिकेने गव्हाच्या बाबतीत क्रांती केली आणि भारताने बासमती तांदूळ पिकवत वाद निर्माण करून या क्षेत्रामध्ये उज्ज्वल यश संपादित केले आहे. बासमती तांदळाला जगभर मागणी असल्याने भारताच्या शेतीक्षेत्रातील चहा बरोबरच बासमती तांदळालाही अनन्य महत्त्व प्राप्त झाले आहे. बासमती तांदळाची जात प्रामुख्याने पंजाब आणि हरियाणा प्रांतात पिकवली जाते आणि भारतातील पहिली आणि एकमेव हरित क्रांती याच दोन प्रांतांमध्ये झाली होती. वास्तविक, भारताने शेतीमालाच्या निर्यातीसाठी 'आग्रेस्को' नावाची संस्था निर्माण केली आहे. त्यामध्ये ५१ टक्के वाटा हा शेतकऱ्यांचा आणि ४९ टक्के सरकारी वाटा अशी पद्धत राबवली गेली आहे. या संस्थेअंतर्गत सरकारी शेतीतज्ज्ञ जगातल्या बाजारपेठेचा अभ्यास करून जास्तीत जास्त दर कोणत्या वेळी आणि कोणत्या मालाला मिळतो याची माहिती संस्थेला देतात. संस्था तेवढाच शेतमाल उत्पादित करून परदेशांना निर्यात करतात. इस्रायल हा वालुकामय प्रदेश आहे; परंतु या संस्थेमुळे तेथील मालाला जास्तीत जास्त दर मिळत असल्याने इस्राएलचा शेतकरी सधन झाला. आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नसताना भारताने अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डंपिंग करून अमेरिकन शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आणले. त्यामुळे होणारा ट्रम्प यांचा थयथयाट पाहता भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे जसे पाकला नमवले होते, त्या पद्धतीने 'ऑपरेशन बासमती' करून अमेरिकेलाही नमवले आहे असे स्पष्ट होते.

डंपिंगबाबत वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनने म्हटले आहे की डंपिंग तंत्राचा वापर करून कोणत्याही देशाने दुसऱ्या देशातील शेतकऱ्यांचे नुकसान करू नये. ते व्यापार तंत्राच्या विरोधी होईल आणि निषिद्ध मानले जाईल. डंपिंगमध्ये एखादा देश दुसऱ्या देशात इतका शेतमाल निर्यात करतो की दुसऱ्या देशातील भाव एकदम कोसळून तेथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. या पार्श्वभूमीवर भरपूर शुल्क लादले गेले असतानाही बासमती तांदूळ इतक्या मोठ्या प्रमाणात अमेरिकेच्या बाजारात कसा पोहोचला, याची सविस्तर माहिती उपलब्ध झाल्यास प्रत्येक भारतीयाला 'ऑपरेशन सिंदूर'सारखाच याही घटनेचा अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही.

अमेरिकन शेती आणि उत्पादन मोठे असले तरी तेथील फक्त दोन टक्केच नागरिक शेती करतात. त्यांचे क्षेत्र मोठे असते, शिवाय उत्पादन खर्च जास्त असतो. त्या तुलनेत भारतीय शेतकरी नगण्य असूनही आपल्या कौशल्याने आणि मेहनतीने जास्तीत जास्त उत्पादन काढून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो. पूर्वीच्या काळासारखी या देशाला अमेरिकेकडे अन्नधान्यासाठी भीक मागावी लागत नाही.

# महाराष्ट्रात भाजपाचा 'गुजराथ पॅटर्न'?

**महाराष्ट्रातील** विधानसभा, महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद निवडणुकांमध्ये एन. डी. ए. ला म्हणजेच पर्यायाने भाजपला जे घवघवीत यश मिळाले आणि विरोधक ज्या पद्धतीने आक्रसत गेले आहेत त्यावरून महाराष्ट्रातही आता 'गुजराथ ' पॅटर्न अस्तित्वात येऊ घातला आहे का याची चर्चा सुरु झाली आहे.याला कारण भाजप नुसताच विजयी झाला आहे असे नाही तर भाजपने जे प्रचंड यश मिळवले आहे त्याची व्याप्ती बघणे आवश्यक ठरते.

विधानसभेत एन. डी. ए. ला २/३ पेक्षा अधिक बहुमत मिळाले त्यात एकटा भाजप व त्याचे सहयोगी सदस्य हे १४५ या मॅजिक (बहुमताच्या ) आकड्याच्या उंबरठ्यावर उभे आहेत.



नगर परिषद निवडणुकीत भाजपचे १२९ नागराध्यक्ष व ३२०० पेक्षा अधिक  नगरसेवक निवडून आले.महाराष्ट्रातील इतर सर्व पक्षांच्या नगरसेवकांची एकत्रित संख्या पाहिली तरी ती एकट्या भाजपपेक्षा कमी आहे.

महापालिका निवडणुकीत भाजपने २९ पैकी जवळजवळ २० महापालिकात स्वबलावर सत्ता मिळवली आहे तर महायुती एकत्रितपणे २५ महापालिकात सत्तेवर येईल अशी संभावना आहे.यात भाजपचे एकूण १४२५ नगरसेवक निवडून आले आहेत आणि ही संख्या क्रमांक २ वर असलेल्या शिंदेच्या शिवसेनेपेक्षा ३९९ तब्बल १००० हून अधिक आहे.

थोडक्यात, महाराष्ट्रात भाजपची 'शत प्रतिशत' सत्ता आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. अशीच स्थिती आपल्या शेजारच्या'गुजरात' राज्यात गेली काही वर्षे आहे आणि म्हणूनच तमाम विश्लेषकांना भीती वाटत आहे की महाराष्ट्रातआता 'गुजरात पॅटर्न' येऊ घातला आहे काय! काय आहे हा गुजराथ पॅटर्न?

गुजराथमध्ये १९९८ पासून सलग २८ वर्षे 'भाजप' सत्तेत आहे.

राज्यातील एखाद दुसरी नगरपालिका सोडली तर इतर सर्वत्र भाजपच सत्तेत आहे.अहमदाबाद महानगरपालिकेत तर भाजप १९८५ पासून सलग ४० वर्षे सत्तेत आहे. इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सुद्धा भाजपचेच वर्चस्व आहे.

वरील वस्तुस्थिती बघता कोणालाही असे वाटेल की गुजराथमध्ये विरोधी पक्ष  'जिवंत' तरी आहे का.यासाठी गेल्या ३० वर्षात गुजरातमधील राजकारणाने जी कूस बदलली त्याचा थोडक्यात परामर्ष घेणे जरूर आहे.

१९९० पर्यंत, एक जनता पक्षाचा कालखंड सोडला तर गुजरातमध्ये काँग्रेसची एक हाती सत्ता होती.१९९५ मध्ये सर्वप्रथम भाजपने स्वबलावर सत्ता मिळवली. पण लगेचच भाजपला 'दुहीचे' ग्रहण लागून त्यांची सत्ता गेली. शंकरसिंह वाघेला यांनी बंड पुकारले आणि स्वतःचा वेगळा पक्ष स्थापन करून काँग्रेसच्या साथीने सरकार बनवले. पण हे सरकार टिकले नाही. १९९८ मध्ये विधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुका घ्याव्या लागल्या. भाजपने परत सत्ता मिळवली. केशुभाई पटेल यांचे सरकार स्थापन झाले पण भ्रष्टाचार व गुजरातमधील २००१च्या भीषण भूकंपानंतर पुनर्वसन करण्यात आलेल्या अपयशा मुळे केशुभाईची उचलबांगडी झाली. अटलजीनी नरेंद्र मोदींना गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून नियुक्त केले. हाच गुजरातमधील 'टर्निंग पॉईट' ठरला.

२००२ फेब्रुवारी मध्ये कारसेवकांचे गोध्रा स्थानाकावर झालेले हत्याकांड व त्यातून उसळलेली राज्यव्यापी दंगल ही मोदींसाठी अग्निपरीक्षाच होती.मोदींनी ही परिस्थिती कुशलतेने हाताळली. २००२च्या अखेरीला मोदींनी मुदतपूर्व निवडणुकीचा जुगार खेळला. हा डाव कमालीचा यशस्वी ठरला आणि मोदी स्पष्ट बहुमत मिळवून पुनः सत्तेत आले. त्यानंतर मोदींनी २००७ व २०१२ या दोन्ही सलग निवडणुका जिंकल्या व ते देशाच्या पंतप्रधानपदाच्या शर्यतीत उतरले. मोदींच्या कारकिर्दीतील तिन्ही निवडणुकात भाजपच्या आमदारांची संख्या ११२ ते १२७ इतकी राहिली. काँग्रेसला ५० ते ६० जागा मिळत होत्या. २०१४ मध्ये मोदी पंतप्रधान झाल्यावर आनंदीबेन पटेल गुजरातच्या मुख्यमंत्री झाल्या. त्यांच्याच काळात गुजरातमधील प्रभावी पाटीदार समाजाचे आरक्षणासाठी आंदोलन झाले. हार्दिक पटेल नावाच्या २२ वर्षीय युवकाने या आंदोलनाचे नेतृत्व केले. हे आंदोलन शमवण्यात आनंदीबेन असफल ठरल्या. २०१७च्या निवडणुकांच्या सव्वा वर्ष अगोदर अचानक आनंदीबेनना पायउतार व्हावे लागले आणि विजय रूपाणी सारख्या सौम्य प्रकृतीच्या व अल्पसंख्य जैन समाजातील व्यक्तीला मुख्यमंत्री केले गेले.

विजय रूपाणी यांच्याच नेतृत्वात २०१७ ची विधानसभा निवडणूक लढवली गेली. या निवडणुकीत काँग्रेसने चांगले आव्हान उभे केले होते. पाटीदार आंदोलनही ताजे होते. दोन्हीचा फटका भाजपला बसला व त्यांनी साधे बहुमत मिळवले पण प्रथमच त्यांचा आकडा १०० च्या खाली आला.

या झटक्यानंतर भाजपने काँग्रेसमधील प्रभावशाली व्यक्तींना भाजप मध्ये घेण्याचा सपाटा लावला. काँग्रेसचे तत्कालीन प्रमुख नेते चावडा यांनीच भाजपमध्ये प्रवेश केला. हार्दिक पटेलचा क्षत्रिय साथीदार कल्पेश ठाकोर याला भाजपमध्ये घेण्यात आले. सगळ्यात कडी म्हणजे पाटीदार आंदोलनाचा चेहरा असलेला हार्दिक पटेल काँग्रेसमधून भाजपमध्ये आला. ठाकोर व हार्दिक यांनी २०१७च्या निवडणुकीत भाजपला जेरीस आणले होते.

२०२-२१ मध्ये आलेल्या कोविडच्या साथीमुळे व  सामान्य जनतेला भोगाव्या लागलेल्या त्रासामुळे रूपाणी सरकारबद्दल जनतेच्या मनात रोष निर्माण होऊन आपल्याला २०२२च्या निवडणुकीत फटका बसू शकतो याचा अंदाज मोदी -शहाना वेळीच आला. त्यांनी संपूर्ण रूपाणी मंत्रिमंडळाला राजीनामा द्यायला सांगितले आणि भुपिंदर पटेल यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण नवीन मंत्रिमंडळ स्थापन केले. आधीच्या मंत्रिमंडळातील एकाही मंत्र्याला नवीन सरकारमध्ये स्थान दिले गेले नाही. या चालीचा जबरदस्त फायदा २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला झाला.

२०२२ मध्ये भाजप विक्रमी १५६ (१८२ पैकी) जागा जिंकून सलग पाचव्यांदा सत्तेत आला. काँग्रेसची धुळधाण उडाली आणि त्यांना फक्त १७ जागा मिळाल्या. याच निवडणुकीत आप पक्षाने गुजरातमध्ये चंचुप्रवेश करून ५ जागा जिंकल्या व काँग्रेसची बरीच मते खाल्ली. काँग्रेसने त्यानंतर जी हाय खाल्ली आहे की आता पक्षाचे गुजरातमधील संघटन पूर्ण मोडकळीस आले आहे. २०१४ व २०१९च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला गुजरातमधून एकही जागा मिळाली नव्हती. २०२४ च्या निवडणुकीत मात्र काँग्रेसला एक जागा मिळाली हीच काय ती एकमेव जमेची बाजू.अर्जुन मोडवाडिया हे काँग्रेसचे मुख्य नेते जे पोरबंदरमधून सतत निवडून येतात त्यांनी सुद्धा आता भाजपमध्ये प्रवेश केला आहे व ते सध्या मंत्री आहेत. दरम्यानच्या काळात भाजप स्थानिक स्वराज्य संस्थांवरील आपली पकड सतत मजबूत करत गेला. गेल्याच वर्षी भाजपने अजून एक धक्का दिला. त्यांनी भुपिंदर पटेलना मुख्यमंत्रीपदी कायम ठेवून बाकी सर्व मंत्रीमंडळ बदलून टाकले आहे. आता २०२७च्या अखेरीस होऊ घातलेल्या निवडणुकीत'प्रस्थापित विरोधी लाटेचा(अँटी इन्कबन्सी) फटका बसू नये म्हणून मोदी-शहा नी घेतलेली ही 'प्रो ऍक्टिव्ह' स्टेप म्हणावी लागेल.एवढेच नाही तर हर्ष संघवी नावाचे नवीन नेतृत्व भविष्याच्या दृष्टीने पुढे आणले आहे. जेमतेम चाळीशीतला हा नेता सध्या गुजरातचा उपमुख्यमंत्री व गृहमंत्री आहे.

सतत ३० वर्षे सत्तेत राहणे ही काही खायची गोष्ट नाही. पण यासाठी भाजपने भाकरी करपू नये म्हणून ती योग्य वेळी फिरवण्याची दक्षता घेतली आहे हेच त्यांच्या यशाचे गमक मानावे लागेल.

एकूणच १९९८पासूनचा भाजपचा गुजरातमधील सत्तेचा प्रवास हा काही सहजसुलभ झालेला नाही हे वरील इतिहासावरून आपल्या लक्षात येईल. पण असंख्य खाचखळगे ओलांडून/टाळून पुढे जाण्याची कला मात्र त्यांनी आत्मसात केली आहे. महाराष्ट्र भाजप हा गुजरात भाजपापेक्षा सध्या खूप मागे आहे. पण गुजरातसारखा लांबचा पल्ला गाठण्यासाठी त्यांच्या मार्गाने पुढे चालायला मात्र महाराष्ट्रात सुरुवात झाली आहे असे मानायला जागा आहे. याचे कारण म्हणजे २०१७ च्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप क्रमांक १चा पक्ष होता. ते स्थान त्यांनी ९ वर्षांच्या दीर्घ काळा नंतर सुद्धा कायम ठेवले आहे. लागोपाठ तीन विधानसभा निवडणुकीत भाजपने १०० पेक्षा अधिक जागा मिळवल्या आहेत ही गोष्ट सुद्धा दुर्लक्षित करता येणार नाही. महाराष्ट्रात भाजपमध्ये इतर पक्षातून होणारे घाऊक पक्षप्रवेश हे गुजरातचेच अनुकरण आहे.

गुजरात मध्ये प्रादेशिक पक्ष नाही. तेथे भाजप -काँग्रेस अशी द्विपाक्षीय लढत आहे.महाराष्ट्रात मात्र भाजपसमोर काँग्रेसबरोबरच प्रादेशिक पक्षांचे आव्हान येत्या काही काळात तरी राहील असे वाटते. आज ना उद्या महाराष्ट्रात 'गुजरात पॅटर्न' अस्तित्वात येईल अशी चिन्हे दाखवणारे महाराष्ट्रातील विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातील निकाल आहेत हे मात्र नक्की.

**- रघुनंदन भागवत**

# एमआयएमची महाराष्ट्रात मुसंडी

**छप्पन्न** वर्षाचे असदुद्दीन ओवेसी हे आक्रमक नेते आहे. मुस्लिमांचे प्रश्न ते जाहिरपणे व संसदेत प्रभावीपणे माडत असतात. ते उत्तम वक्ते आहेत. भाषणात ते संविधान व भारतीय कायद्याचे कलम सांगून पुरावे देत असतात. तथाकथित धर्मनिरपेक्ष पक्ष मोदींना देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्यापासून रोखू  शकले नाहीत किंवा महाराष्ट्रात महायुतीला सत्तेवर येण्यापासून कोणी अडवू शकले नाही, अशी खंत त्यांनी बोलून दाखवली आहे. यापुढे राजकीय पक्षांना मुस्लिम मतदारांना गृहित धरता येणार नाही, असे त्यांनी बजावले आहे.



महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांमधे एआयएमआयएम पक्षाचे १२६ नगरसेवक निवडून आल्याने सर्वच राजकीय पक्षांना धक्का बसला आहे. मुस्लिम व्होट बँकेच्या जोरावर या पक्षाने मिळालेल्या यशामुळे काँग्रेस, सपा, राष्ट्रवादी काँग्रेस अशा पक्षांना मुस्लिम मतदारांनी इशारा घंटा दिली आहे. धर्मनिरपेक्ष पक्ष असा बँड वाजवत हे पक्ष मुस्लिम मतदारांना वर्षानुवर्षे आकर्षित करीत आहेत पण नंतर त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते, हीच भावना मुस्लिम समाजात बळावली आहे. मुस्लिम मतदारांनी मोठ्या प्रमाणावर एमआयएमला मतदान केले, हे निकालानंतरच उघड झाले.

महाराष्ट्रात चार- पाच मोठे राजकीय पक्ष आघाडी किंवा युती करून एकमेकांच्या विरोधात लढत असतात.  प्रकाश आंबेडकर किंवा रामदास आठवले यांच्या पक्षाला युती किंवा आघाडीला बरोबर घ्यावे लागते. पण एमआयएमला बरोबर घेऊन लढावे अशी कोणाची हिम्मत झाली नव्हती. यावेळी अकोला जिल्हयातील अकोटमधे स्थानिक पातळीवर भाजपाने एमआयएमशी समझोता केला तेव्हा मोठा गहजब माजला. एमआयएम ही भाजपची बी टीम आहे असा टीकेचा भडिमार विरोधी पक्षाने केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एमआयएमशी भाजपने केलेला समझोता कदापि मान्य होणार नाही, असे जाहीर करावे लागले. महाराष्ट्रात अनेक राजकीय पक्ष असताना मुस्लिम मतदारांना  दुसऱ्या राज्यातील एमआयएम हा पक्ष जवळचा का वाटावा ? महाराष्ट्रातील मुस्लिमांचा राज्यातील राजकीय पक्षांवर विश्वास राहिला नाही का ?  गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत आणि यंदाच्या वर्षा झालेल्या महापालिका निवडणुकीत मुस्लिम मतदारांनी उद्धव ठाकरे यांच्या उबाठा सेनेला मतदान केले. ते काही ठाकरेंविषयी प्रेम म्हणून नव्हे. तर ठाकरे हे भाजपच्या विरोधात कणखरपणे लढत आहेत म्हणून मुस्लिम मतदारांनी मशालीवर बटण दाबले. आता एमआयएम हा पक्ष त्यांना जवळचा वाटू लागल्यामुळे मुंबईमधे उद्धव ठाकरेंच्या पक्षाचे नुकसान होणार आहे.

ओवेसी यांनी सुरूवातीला महाराष्ट्रात मराठवाड्यात लक्ष्य केंद्रीत केले. छत्रपती संभाजीनगर व नांदेड वाघाळा महापालिकेत एमआयएमने प्रथम शिरकाव केला. यंदाच्या निवडणुकीत छत्रपती संभाजीनगर महापालिकेत ३३ तर नांदेड वाघाळा महापालिकेत १४ नगरसेवक एमआयएमचे निवडून आले आहेत.  छत्रपती संभाजीनगरमधे शिवसेना व उबाठा सेनेपेक्षा जास्त नगरसेवक एमआयएमचे निवडून आले आहेत. मुंबईमधे ८, नागपूरमधे ६ तर ठाण्यात ५  नगरसेवक निवडून आणण्याची किमया एमआयएमने केली आहे. मुंबईमधे राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ६ नगरसेवक निवडून आले आहेत. तर एमआयएमचे मालेगावमधे २१, धुळ्यात १०, अमरावतीत १२, सोलापूर महापालिकेत ८ नगरसेवक निवडून आले आहेत.

मुस्लिम मतदार कसा एकवटलेला आहे हे त्याचे चित्र आहे. एका रात्रीत किंवा मशिदीतून ऐनवेळी फतवा निघाला म्हणून एमआयएमला मुस्लिमांचे एक गठ्ठा मतदान झालेले नाही. महाराष्ट्रातील महापालिका निवडणकीची तयारी एमआयएमकडून अगोदरपासून चालू होती. निवडणुकीचे सूक्ष्म व्यवस्थापन करणाऱ्या भाजपालाही त्याची कुणकूण लागली नाही. सन १९९९ मधे एमआयएमने महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक लढवली होती. २०१२ साली नांदेड महापालिकेत एमआयएमचे ११ नगरसेवक निवडून आले. २०१७ मधे मात्र या पक्षाला खातेही उघडता आले नव्हते. २०१४ मधे मोदी लाटेत एमआयएमचे दोन आमदार महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले. २०१५ मधे औरंगाबाद महापालिकेवर या पक्षाचे २५ नगरसेवक निवडून आले. २०१२ मधे महाराष्ट्रात नोंदणीकृत पक्ष म्हणून निवडणूक आयोगाकडे एमआयएमची नोंद झाली. २०१९ मधे इम्तियाज जलिल हे औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून एमआयएमचे खासदार म्हणून निवडून आले. वर्षानुवर्षे मुस्लिम मतदार काँग्रेसला मतदान करीत होता.

मुंबईतील मुस्लिमांची वस्ती मोठ्या संख्येने असलेल्या प्रभागातून काँग्रेसचे उमेदवार म्हणून मुस्लिम नगरसेवक महापालिकेत निवडून येत असत. नबाब मलिक आणि अबू आजमी यासारखे नेते मुस्लिम मतदारांना आपल्या पक्षाकडे आकर्षित करीत असत. मलिक हे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मुंबईचे अध्यक्ष आहेत तर आजमी हे मुंबईतील सपाचे मोठे नेते आहेत. यंदाच्या निवडणुकीत मुंबई व महाराष्ट्रातील मुस्लिम मतदारांनी काँग्रेस, राष्ट्रवादी किंवा सपा यांना एमआयएम हा पर्याय स्वीकारला असल्याचे निकालानंतर स्पष्ट झाले आहे.

छपन्न वर्षाचे असदुद्दीन ओवेसी हे आक्रमक नेते आहे. मुस्लिमांचे प्रश्न ते जाहिरपणे व संसदेत प्रभावीपणे माडत असतात. ते उत्तम वक्ते आहेत. भाषणात ते संविधान व भारतीय कायद्याचे कलम सांगून पुरावे देत असतात. तथाकथित धर्मनिरपेक्ष पक्ष मोदींना देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्यापासून रोखू  शकले नाहीत किंवा महाराष्ट्रात महायुतीला सत्तेवर येण्यापासून कोणी अडवू शकले नाही, अशी खंत त्यांनी बोलून दाखवली आहे. यापुढे राजकीय पक्षांना मुस्लिम मतदारांना गृहित धरता येणार नाही, असे त्यांनी बजावले आहे. महाराष्ट्रात जिल्हा परिषद निवडणुका लढविण्याचा त्यांच्या पक्षाचा विचार आहे तसेच पश्चिम बंगाल, तामिळनाडू. आसाम येथेही येणाऱ्या विधानसभा निवडणुका एमआयएम लढविणार आहे. गेल्या काही वर्षापासून जसे हिंदुत्वाच्या नावावर मतांचे ध्रुवीकरण होते आहे तसेच मुस्लिम, ख्रिश्चन, आदी धर्मियांच्या नावावरही मतांचे एकत्रीकरण होते आहे. भाजपने महापालिका निवडणुकीत एकाही मुस्लिमाला उमेदवारी दिली नव्हती. मुस्लिमांचा भाजपला विरोध आहेच पण धर्मनिरपेक्ष म्हणविणारे पक्षही मुस्लिम समाजाला प्रतिनिधीत्व देत नाहीत हा या समाजाचा रोष आहे. लोकसभा - विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडी होती, म्हणून मुस्लिमांनी आघाडीला मतदान केले. महापालिका निवडणुकीत आघाडी नव्हती म्हणून पर्याय म्हणून एमआयएमला पसंती दिली. मुस्लिम समाजावर कट्टरतावादी नेत्यांचा प्रभाव जास्त आहे, पुढील पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुकीत मुंब्रा संपूर्ण हिरवा करण्याचे आवाहन एमआयएमची नवनिर्वाचीत तरूण नगरसेविकेने करताच, समाजात जल्लोश झाला, यावरून देशभर लोकशाहीला धोका म्हणून आक्रोश प्रकटला. ध्रुवीकरणाला वेग आला तर त्याचा लाभ भाजपलाच होतो हे निवडणूक निकालाने सिध्द केले आहे.

एआयएमआयएम म्हणून देशात ओळखल्या जाणाऱ्या या पक्षाचे नाव ऑल इंडिया मजलिस - ए इत्तेहादुल मुसलमीन असे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातच या पक्षाची स्थापना हैदराबाद संस्थानमधे झाली. इदेहत्त म्हणजे ऐक्य. समाजात ऐक्य भावना जोपासण्यासाठी व टिकविण्यासाठी एआयएमआयएम स्थापना झाली. सुरूवातीच्या काळात नवाब बहादूरयार जंग यांनी या संघटनेचा कारभार पाहिला.  एआयएमआयएमची उभारणी व इतिहास हा संघर्षाचा आहे. बहादूरयार जंग यांच्यानंतर कासीम रझवी संघटनेचे अध्यक्ष झाले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी  रझा नावाची संघटना स्थापन केली. पोलीस कारवाईनंतर रझाकारांवर खटले दाखल झाले. कासीम रझवी यांनाही शिक्षा झाली. सुरूवातीला चंचलगुडा जेलमधे व नंतर पुण्याच्या येरवडा जेलमधे त्यांना ठेवण्यात आले. १९५७ मधे त्यांची सुटका झाल्यावर ते कराचीला निघून गेले व तिथेच त्यांचा १९७० मधे मृत्यु झाला. दरम्यान अबदुल वाहिद ओवेसी यांनी इत्तेहादुल मुसलमीनचे पुनरूज्जीवन केले व नंतर त्यांच पुत्र सुलतान सलाउद्दीन ओवेसी एमआयएमचे अध्यक्ष झाले. सलाउद्दीन ओवेसी हे हैदराबाद पालिकेच सदस्य होते. नंतर ते वेगवेगळ्या मतदारसंघातून आंध्र प्रदेशच्या विधानसभेत चार वेळा निवडून गेले. १९६२ ते प्रथम आमदार झाले.  नंतर ते खासदार म्हणून निवडून गेले. सलाउद्दीन ओवेसी यांचे पुत्र असदुद्दीन ओवेसी हे १९९४ ते २००४ या काळात आंध्र प्रदेश विधानसभेत आमदार होते. नंतर ते हैदराबादमधून लोकसभेवर खासदार आहेत. असदुद्दीन यांचे भाऊ अकबरूद्दीन हे आंध्र प्रदेश विधानसभेत आमदार आहेत. एआयएमआएमने केवळ हैदराबादचा स्थानिक पक्ष ही ओळख पुसून आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक अशी अनेक राज्यात मजल मारली आहे.

**-सुकृत खांडेकर**

# वीरभद्र यात्रेत रोहिदास भगत यांनी ओढल्या १२ बैल गाड्या



वैजापूर, दि. २७ (प्रतिनिधी) – शहराचे जागृत दैवत श्री. वीरभद्र महाराज यांच्या यात्रोत्सव निमित्त सोमवार (ता.२६) रोजी शहरातील रोहिदास भगत यांनी डफगाच्या तालबद्ध वाद्याच्या सूरात जवळपास एक फर्लांगभर१२ बैल गाड्या ओढल्या व वीरभद्र महाराजा च्या प्रति सद्भाव व सेवा सादर केली.तसेच जुन्या पारंपरिक बाबींची उपस्थितांना ओळख करून दिली.दरवर्षी येथे वीरभद्र मंदिर समोर वीरभद्र महाराज यांच्या नावाने मोठी यात्रा भरते तालुक्यातील ग्रामीण भागातील भक्त भाविक व शहरातील प्रतिष्ठीत नागरीक पुरुष व म हिला मोठ्या संख्येने उपस्थित असतात.याही वर्षी तालुक्यातील शहर भाविक व ग्रामीण भागातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दिनी सायंकाळी शोभेची दारू सोडण्यात आली, तसेच सांस्कृतिक कार्यक्रम अंतर्गत फड कार्यक्रम ही झाला. भक्त भाविकांना महाप्रसाद ही प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी सूत्र संचलन व आभार सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले,प्रास्तविक गणेश गावडे यांनी केले.या प्रसंगी पालिका शिक्षण सभापती बाबासाहेब पुतळे,नगरसेवक श्री.त्रिभुवन, जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, सोन्याबापू गावडे,दीपक साळुंके,रामकीसन जोरे पाटील,दिगंबर खंडागळे,गंगाधर त्रिभुवन, सोनू राजपूत,चांगदेव उघडे.डी.एस, गायकवाड यांचा आयोजकांनी सत्कार केला. आयोजक रोहिदास भगत, गणेश गावडे रवी गावडे, ललित गावडे, गोरख गावडे, किशोर गावडे, पप्पू गावडे,बाबुराव गावडे भूषण गावडे, या नव्या पिढीच्या तरुण युवकांनी सहभाग नोंदवून कार्यक्रम घडवून आणला. शेवटी ललित गावडे यांनी आभार मानले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) – प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, एकनाथ बंगाळे, प्रविण फुलारी, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ तसेच सर्व अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते.



# वैजापूर ग्रामीण–१मध्ये शिव महापुराण कथा निमित्त, 'ब्रह्मध्वज' पूजन उत्साहात



वैजापूर, दि. २७ (प्रतिनिधी) – वैजापूर ग्रामीण– १ मध्ये रामवाडी, गायकवाडवाडी, फुले वाडी या परीसरात सम शृंगी माता मित्र मंडळ यांच्या वतीने ३फेब्रुवारी ते ७फेब्रुवारी–२०२६दरम्यान 'श्री रामेश्वर महादेव मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्या निमित्त मराठी भाषेत'श्री शिव महापुराण कथा'होणार आहेत, यास्तव सोमवार(ता,२६)रोजी रामवाडी शिवराई रस्ता या ठिकाणी 'ब्रम्हध्वज', पूजन, आरती व ध्वजारोहन महंत स्वामी गुलाबगिरीजी महाराज व योगी धर्मराज महाराज यांच्या उपस्थितीत सम्पन्न झाले.पूजनासाठी स्वामी गुलाबगिरी महाराज व योगी धर्मनाथ महाराज तसेच नवनिर्वाचित नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, सौ. शिल्पाताई परदेशी, कैलास पवार व सौ. पवार, शिवाजी पेहरकर व सौ. पेहरकर तसेच अमोल बोरनारे, अर्जिक्य बोरनारे बसले होते. या कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्र संचलन जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले.श्री शिव महापुराण कथेचा लाभ पंचक्रोशीतील सर्वांनी घेऊन या सप्त श्रृंगी माता मंडळाला आपला सर्वांचा कार्यक्रम सम जून सहकार्य करावे असे आवाहन डॉ.दिनेश परदेशी यांनी केले.या प्रसंगी नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष रियाज अकील शेख व सर्व नवनिर्वाचित नगरसेवक सह रामवाडी, गायकवाडवाडी, फुलवाडी पंचक्रोशीतील महिला, पुरुष व भक्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिन वैजापूरात विविध कार्यक्रमानी उत्साहात संपन्न



वैजापूर, दि. २७ (प्रतिनिधी) – येथील जि.प. प्रशाला मुलींची व मुलांची मध्ये मुख्य शासकीय ध्वजवंदन उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांच्या हस्ते ध्वजारोहन होऊन या ठिकाणी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण अंतर्गत उपस्थिताना शपथ देण्यात आली, असाक्षर मुक्त गावाची शपथ, १०वी व १२वी व इतर कॉपीमुक्त परीक्षा देण्याची शपथ, धोंडीराम राजपूत यांनी दिली.

सकाळी ठीक १०–००वाजता राष्ट्रभक्तीपर गीतांवर सांघिक कवायत,शैक्षणिक दस सूत्रीवर आधारित पथनाट्य, झेंडा गीत कवायत, राष्ट्रभक्तीपर भाषणे व गीते विद्यार्थ्यांनी सादर केले. मुलींच्या प्रशालेचे मुख्याध्यापक श्री पगार सर यांनी आयोजन केले तर त्यांना सहाय्य श्रीमती भोये, श्री.वाघ ,श्री सुरडकर,श्री बोढरे, श्री बी.बी. जाधव,वयांनी सहकार्य केले. स,पो,नी एकनाथ नागरगोजे यांनी दिली.

सूत्र संचलन सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले.या प्रसंगी तहसीलदार सुनील सावंत,नायब तहसीलदार रामेश्वर महाजन,श्री,कुमावत, मुख्याधिकारी भागवत बिघोत,स.गट,विकास अधिकारी श्री, जायभाए ,जितेंद्र चापानेरकर,अशोक आप्पा पवार,दीपक त्रिभुवन, नीता पाटील,सुभाष गोम लाडू आर,डी,वसावे यांची उपस्थिती होती. शहरात पालिकेत नवनिर्वाचित नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपनगराध्यक्ष रियाज अकील शेख, तहसीलमध्ये सुनील सावंत, उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, पो.नि. सत्यजित ताईतवाले, हुतात्मा स्मारकात वीर पत्नी लक्ष्मीबाई भोसले, यांनी ध्वजवंदन केले या प्रसंगी माजी नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, मजीद कुरेशी दशरथ बनकर, उल्हास ठोंबरे, साबेरखान, मुख्याधिकारी भागवत बिघोत यांची उपस्थिती होती. शहरातील सर्व पुतळ्याना नगसेवक व शहरातील नागरिकांनी अभिवादन केले. शहरातील शासकीय, निमशासकीय कार्यालयात व शैक्षणिक संस्थांत ही प्रजासत्ताक दिन उत्साह व शांततेत संपन्न झाला.


# मनपा प्रियदर्शनी विद्यालयात 'हिंद दी चादर' कार्यक्रमानिमित्त व्याख्यान



छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) – मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय प्रियदर्शनी मयूरबन कॉलनी, या शाळेत गुरुदेव सिंग उर्फ रोमिसिंग छाबडा, व हरप्रीतकौर छाबडा यांनी 'हिंद दी चादर' या कार्यक्रमाबद्दल विद्यार्थ्यांना व उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक संजीव सोनार यांनी प्रास्ताविक करून उपस्थित उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले.

'हिंद दी चादर' उपक्रम हा श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५०व्या शहिदी (बलिदान) समागम वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागाने आयोजित केलेला एक भव्य आणि ऐतिहासिक धार्मिक–सांस्कृतिक महोत्सव आहे. श्री गुरु तेग बहादुरजींना 'हिंद दी चादर' (हिंदुस्थानाची ढाल/रक्षणकर्ता) हे नाव दिले गेले आहे, कारण त्यांनी काश्मिरी पंडितांसह सर्व धर्मांच्या लोकांच्या धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी आपले शिर धरले. त्यांचे हे बलिदान हिंदुस्थानातील सहिष्णुता, एकता आणि धर्मरक्षणाचे प्रतीक मानले जाते. हा दोन दिवसीय (२४ आणि २५ जानेवारी) सोहळा मोदी मैदानावर ५२ एकर क्षेत्रात होणार आहे. छाबडा दांपत्य यांनी अतिशय सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन रश्मी होनमुटे व आभार प्रदर्शन तेजस्विनी देसले यांनी केले.

# भारतीय प्राचीन संस्कृती व मूल्यांचा सामाजिक ठेव्याचे प्रदर्शन भरवित वैजापुरात 'हळदी-कुंकू'



वैजापूर, दि. २७ (प्रतिनिधी) – येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या देवगिरी ग्लोबल इंग्लिश स्कुल च्या वतीने भारतीय पारंपरिक वस्तू, वास्तू, साहित्य, विहीर, जाते, कंदील, झोपडी, माठ चिमणी, पाटा, वरवंटा, इत्यादी वस्तूंचे प्रदर्शन भरवून 'हळदी–कुंकू' कार्यक्रमात वृक्ष रोपटी वाटप करून उत्साहात कार्यक्रम शनिवार(ता,२४)रोजी आयोजित केला होता. प्राचार्या शिल्पा वर्मा म्हणाल्या की,आपली जुनी संस्कृती व मूल्ये महिलांना माहीत व्हावी व सामाजिक मूल्ये ही महिलांनी विशेषतः विद्यालयातील

मुलां–मुलींच्या पाल्यानी ज्ञात व्हावी म्हणून प्राचीन जुन्या वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करून 'हळदी–कुंकू' कार्यक्रम आयोजित केला आहे.या प्रसंगी शहरातील सर्व भागातील महिलांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन आपली जुनी संस्कृती, तसेच ग्रामीण लूक,जाणून घेतला. प्राचार्या शिल्पा वर्मा (भाटिया),उषा पठारे,मयुरी राजपूत,सोनाली राजपूत, प्रतिभा गायकवाड, श्रीमती श्रीवास्तव व सर्व शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेत सर्व जुने वस्तू व साहित्य मिळवून हे प्रदर्शन भरविले होते. सुनीता साखरे,सोनाली थोरात, श्रीमती साखरे यांनी या प्रदर्शनाबद्धल शिक्षगवृंद यांचे अभिनंदन केले.

# प्रबोध जोशीच्या व्हायोलिन वादनाने ध्वनी आर्टसची संगीत मैफल रंगली




पुणे दि. २७ (विजय न्यायाधीश यांजकडून) – संगीत ही आत्म्याची भाषा आहे ती ज्याला समजली त्यांचे जीवन समृद्ध झाल्याशिवाय राहत नाही ' या विधानाची प्रचिती देणारी व्हायोलिन वादनाची मैफिल शनिवार दि. २४ रोजी संध्याकाळी पार पडली. चोखंदळ रसिकांच्या प्रतिसादात रंगत गेलेल्या या मैफलीचे आयोजन ध्वनी आर्टसच्या संचालिका कल्याणी लोखंडे – पंडित यांच्यावतीने बाणेर हिल परिसरात करण्यात आले होते. निमंत्रित कलावंत प्रबोध जोशी यांनी व्हायोलिन वादनाच्या या मैफिलीसाठी राग बिहागची निवड केली होती.

सुश्री स्वप्नाताई दातार यांचा शिष्य असलेल्या प्रबोधने सुरुवातीला विलंबित एकतालातील आलापी, बढत , तानांच्या माध्यमातून रागविस्तार करीत उपस्थित रसिकांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर ' सब सखियाँ चलो....' ही बंदीश सादर केली. ' रंग सारी गुलाबी चुनरिया ' या उपशास्त्रीय रचनेव्दारे मैफिलीत माहोल निर्माण करीत उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळवली. त्यापाठोपाठ दादरा तालात विविध गायकांच्या आवाजातील गाण्यांच्या सुरावटी सादर करीत या युवा कलावंताने मैफलीतील वेगळेपण अधोरेखित केले. निघालो घेऊन दत्ताची पालखी या रचनेव्दारे मैफलीचा समारोप करण्यात आला. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या मैफलीत प्रबोध जोशी याच्या व्हायोलिनवादनाला पं. सुरेश तळवलकर यांचे शिष्य वेदांग जोशी याने अतिशय समर्पक अशी साथसंगत केली. या मैफिलीतील कलावंतांचे स्वागत अश्विनी अनिल लोखंडे यांनी केले तर कल्याणी कुणाल पंडीत हिने आभार मानले. मैफिलीच्या आयोजनामागील भूमिका सांगताना कल्याणी हिने सांगितले की, भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रसार आणि प्रचार करण्यासोबतच रसिकांची अभिरुची संपन्न करण्याचा ध्वनी आर्टसचा प्रयत्न आहे. सातत्याने अशा प्रकारच्या मैफिलींमधून युवा कलावंतांना प्राधान्य देणार असल्याचे कल्याणी हिने विशेषत्वाने सांगितले.

# मराठी रीलस्टार प्रथमेश कदमचे निधन

मुंबई, दि. २७(प्रतिनिधी)– लोकप्रिय मराठी रीलस्टार आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर प्रथमेश कदमचं निधन झालं आहे. प्रथमेशच्या निधनाचे कारण अद्याप समजलेले नाही. पण तो काही दिवसांपासून आजारी होता आणि या आजारपणातच त्याने अखेरचा श्वास घेतला. प्रथमेशच्या मित्रांनी सोशल मीडिया पोस्ट करुन त्याच्या निधनाची बातमी दिली.

काही वर्षांपूर्वी प्रथमेशच्या वडिलांचं निधन झालं होतं. त्यानंतर प्रथमेशवर कुटुंबाची जबाबदारी आली. प्रथमेशने घराची जबाबदारी सांभाळलीच. याशिवाय या दुःखावर मात करत त्याच्या आईलाही धीर दिला होता. गेल्या अनेक वर्षांपासून प्रथमेश आणि त्याची आई प्रज्ञा कदम हे दोघे एकत्र रील करत होते. ही रील सोशल मीडियात व्हायरल होत होती. प्रथमेशचे कौतुक होत होते. अचानक त्याच्या निधनाची बातमी आल्यामुळे चाहत्यांना धक्का बसला आहे. प्रथमेशचा मित्र तन्मय पाटेकरने इन्स्टाग्रामवर पोस्ट करुन लिहिलंय की, ''तू सदैव आठवणीत राहशील प्रथमेश, देवाघरी स्वतःची काळजी घे रे ! खूप आठवण येईल तुझी Miss You Bhai''. साधा, प्रेमळ स्वभाव आणि डान्सच्या टॅलेंटमुळे प्रथमेश कदमने अल्पावधीत सर्वांचं मन जिंकलं. आधी पती आणि आता मुलाचं छत्र हरपल्याने प्रथमेशच्या आईवर शोककळा पसरली आहे. प्रथमेशचे मित्र आणि चाहते या कठीण प्रसंगात प्रथमेशच्या आईच्या दुःखात सहभागी आहेत.

# जिल्हाभरात आज एकाचवेळी 'आरोग्य समुपदेशन कार्यशाळा' विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी व्यापक उपक्रम

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्य संवर्धनाच्या उद्देशाने 'आरोग्य समुपदेशन कार्यशाळा' उद्या बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये एकाच वेळी आयोजित करण्यात येत आहे. हा उपक्रम दशसूत्री कार्यक्रमांतर्गत 'आरोग्य क्षम विद्यार्थी घडविणे' या मुख्य हेतूने राबविण्यात येत असून 'आरोग्य धनसंपदा' या टॅगलाईनखाली ही कार्यशाळा संपन्न होणार आहे. या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

आजच्या बदलत्या सामाजिक व तांत्रिक वातावरणात विद्यार्थ्यांमध्ये असंतुलित आहार, स्क्रीन टाईमचा अतिरेक, मोबाईल व सोशल मीडियाचा वाढता वापर, स्वच्छतेकडे दुर्लक्ष, मानसिक ताणतणाव, चिंता, नैराश्य तसेच जीवनशैलीशी संबंधित विविध आरोग्यविषयक समस्या वाढताना दिसत आहेत. किशोरवयीन वयात होणारे शारीरिक बदल आणि त्यातून निर्माण होणारी मानसिक व भावनिक अस्थिरता लक्षात घेता, विद्यार्थ्यांना योग्य वेळी तज्ज्ञांचे मार्गदर्शन व समुपदेशन मिळणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर ही एकदिवसीय आरोग्य समुपदेशन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेमध्ये आरोग्य विभागातील डॉक्टर, समुपदेशक, आरोग्य विषयक सल्लागार तज्ज्ञ तसेच शासकीय व खाजगी वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत तज्ज्ञ डॉक्टर विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. संतुलित व पोषक आहाराचे महत्त्व, वैयक्तिक व परिसर स्वच्छता, स्क्रीन टाईमचे नियमन, मोबाईल व सोशल मीडियाचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम, व्यसनमुक्ती, किशोरवयीन आरोग्य समस्या, मानसिक ताणतणाव व भावनिक बदल अशा विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यासोबतच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना तज्ज्ञांकडून थेट उत्तरे देणे तसेच वैयक्तिक आणि गट समुपदेशनाचाही समावेश या कार्यशाळेत करण्यात आला आहे.

या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी महसूल विभाग, शिक्षण विभाग व जिल्हा परिषद यामधील सर्व सन्माननीय अधिकारी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यामध्ये माननीय जिल्हाधिकारी महोदय हे इंग्रजी होली क्रॉस शाळा, छावणी येथे, तर माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर हे सरस्वती भुवन प्रशाला, औरंगपुरा येथे उपस्थित राहणार आहेत. याशिवाय जिल्हा परिषद, पंचायत समिती, महसूल व आरोग्य विभागातील अधिकारी विविध शाळांना भेट देऊन कार्यशाळेचे निरीक्षण करणार असून विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी भेट देणारे अधिकारी, संबंधित शाळांचे मुख्याध्यापक तसेच समुपदेशन करणारे डॉक्टर यांना गुगल लिंकद्वारे कार्यशाळेसंदर्भातील आवश्यक माहिती भरावी लागणार असून त्याद्वारे कार्यशाळेचे मूल्यमापन व अहवाल संकलन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांसाठी एक पूर्ण तास आरोग्य क्षम विद्यार्थी घडविण्यासाठी द्यावा, असे आवाहन माननीय जिल्हाधिकारी महोदयांनी केले असून या आवाहनाला जिल्ह्यातील सर्व आरोग्य यंत्रणांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शाळांसोबत समन्वय साधण्याची जबाबदारी माध्यमिक शिक्षण विभागामार्फत पार पाडण्यात येत आहे.

ही आरोग्य समुपदेशन कार्यशाळा केवळ एक कार्यक्रम न राहता विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणारी, त्यांच्या आरोग्यविषयक समस्या समजून घेणारी आणि आरोग्यदायी सवयी अंगीकारण्यास प्रवृत्त करणारी ठरणार आहे. शाळा, पालक आणि आरोग्य यंत्रणा यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास प्रशासनाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# श्री प्रभू विश्वकर्मा जयंती निमित्त दिनांक ३० जानेवारीला एकता वाहन रॅली

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- विश्वकर्मा समाजाच्या शिल्पकार, वास्तुशिल्प, आर्किटेक्चर, इंजिनियर, कास्ट शिल्पकार, मूर्तिकार व समाजबादवाचे वतीने भगवान जय श्री विश्वकर्मा यांची जयंती ३१ जानेवारी रोजी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त श्री विश्वकर्मा समाजाच्या वतीने शहरात एकता वाहन रॅली काढण्यात येणार आहे. एकता वाहन रॅलीला दिनांक ३० जानेवारी रोजी सकाळी १०-०० वाजता श्री गणेश विश्वकर्मा मंदिर एन/६, सिडको, श्री विश्वकर्मा चौकतून सुरुवात होईल. भगवान श्री जय विश्वकर्मा ची प्रतिमा व रथ सर्वांचे आकर्षण असणार आहे. ध्वज व फेटा व दोन लाईन मध्ये मोटरसायकल रॅली आकर्षित राहणार आहे.

मान्यवराच्या हस्ते मूर्ती/प्रतिमेला नारळ, पेढा व पुजा पुष्पहार अर्पण करून एकता वाहन रॅलीला सुरुवात होईल .श्री विश्वकर्मा चौक,एन/६, सिडको, एमजीएम चिस्तीया चौक, सिडको बस स्टँड, कामगार चौक, जय भवानी चौक, हनुमान चौक, पुंडलिक नगर, गजानन महाराज चौक, गारखेडा सूतगिरणी चौक, शहानुर मिया दर्गा चौक ते बीड बायपास, सातारा, एमआयटी मार्गे बायपास, श्रीकृष्ण चौक रेल्वे स्टेशन ते कांचनवाडी, श्री विश्वकर्मा मंदिर नक्षत्र वाडी येथे समारोप होईल.

श्री विश्वकर्मा चौक एन६,सिडको या ठिकाणी फटाक्याची आतिश बाजी करीत शुभायात्रेला सुरुवात होईल. श्री विश्वकर्मा मंदिर नक्षत्र वाडी भवन या ठिकाणी पोहोचेल. सर्व प्रमुख अतिथीचे हस्ते भगवान जयश्री विश्वकर्मा मूर्ती/प्रतिमेची पूजा व महाआरती करण्यात येईल. विश्वकर्मा समाजाचे जेष्ठ नागरिक व समाज बांधव यांच्या उपस्थितीत राहणार आहे. नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. एकता वाहन रॅलीत सर्व समाज बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्री गणेश विश्वकर्मा मंदिर/विश्वकर्मा चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष अशोकजी पगार, श्री विश्वकर्मा मंदिर नक्षत्रवाडीतील अध्यक्ष ज्योतिषाचार्य प्रकाश जी जागिंड,मंदिर अध्यक्ष बाळापूर श्री रामशब्द विश्वकर्मा,श्री प्रभू विश्वकर्मा जयंतीच्या अध्यक्ष हेमंत जाधव, उपाध्यक्ष मनोज पळसकर उद्धवराव थोईरात,बबन पवार, पुखराज जांगिड़, देवीलाल जांगिड़, सुनील जांगिड़, नेमिचंद जांगिड़, कैलाश जांगिड़, संतोष सपकाळ, राम थोईरात, राकेश विश्वकर्मा, राजू सालपे,जयंवत गाडेकर, भगवान पांचाळ, नागेश साखरे, स्वप्निल शिरसाट,अरुण भालेकर, गोपाळ राऊत,दीपक परेराव, बाबुराव कळसकर, बिट्टू गाडेकर, विलास वाघ,बाळू रायमल, रामभरोस जांगिड़, दिनेश जांगिड़, व रैलीचे अध्यक्ष ज्योतिषाचार्य प्रकाश जी जांगिड़ आणि सकल विश्वकर्मा समाज यांनी मोठ्या संख्येने समाज बांधवयांची सहभागी व्हावे असे आव्हान केलं.

# प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; शानदार संचलन पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजवंदन

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन समारंभाचा जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा पोलीस आयुक्तालयाच्या देवगिरी या मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडला. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. त्यानंतर झालेल्या शानदार संचालनाने उपस्थितांच्या मनात देशभक्तीची भावना वृद्धिंगत केली.

पोलीस आयुक्तालयातील देवगिरी मैदानावर हा मुख्य शासकीय सोहळा पार पडला. विधानपरिषदेचे सद्सय आ. संजय केणेकर, माजी विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे तसेच विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे तसेच सर्व विभागप्रमुख, स्वातंत्र्य सैनिक, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजवंदन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत होऊन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. राज्यगीतही सादर झाले. पालकमंत्र्यांनी परेड निरीक्षण करुन उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

आपल्या भाषणात पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, आपल्या देशात प्रजासत्ताक लोकशाहीचा





अंगिकार आजच्या दिवशी झाला. विविधतेने नटलेला आपला हा देश एकतेच्या सुत्रात गुंफणाऱ्या संविधानाची महती घरोघरी पोहोचवू या. आपली लोकशाही, आपले प्रजासत्ताक बळकट करण्यासाठी सारे मिळून प्रयत्न करु. असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

**विविध सन्मान**

प्रजासत्ताक दिन समारंभात राष्ट्रपती पदक विजेते व पोलीस महासंचालक पदक विजेत्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

**राष्ट्रपती पदक विजेते**

अपर पोलीस अधीक्षक किरण जितेंद्रसिंग पाटील, सहायक पोलीस उपनिरीक्षक अफजलखान शहजादेखान पठाण

केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२५

पोलीस उपआयुक्त श्रीमती शर्मिष्ठा घारगे- वालावलकर,

पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह २०२५

पोलीस निरीक्षक श्रीमती गीता बागवडे, अंमली पदार्थ प्रतिबंधक शाखा, पोलीस उपनिरीक्षक शेख हबीब खान, पोलीस उपनिरीक्षक दिपक सुगनसिंग परदेशी, विशेष शाखा, पोलीस उपनिरीक्षक इसाक उस्मानखान पठाण, पोलीस उपनिरीक्षक संजय जानुजी जोगदंडे, स.पोलीस उपनिरीक्षक विष्णु लक्ष्मणराव उगले, पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रभाकर साहेबराव राऊत, संतोष गंगाराम लोढे, विठ्ठल विनायकराव मानकापे, कैलास तेजराव गाडेकर, मच्छींद्रनाथ रंगनाथ जाधव, शिवाजी राजाराम कचरे, श्रीमती दरखशा इल्तेजा रिजवान शेख, मो. इरफान मो.इसाक खान ,राजेंद्र देविदास चौधरी, लक्ष्मण दशरथ किर्तीकर, बाळासाहेब जयसिंग आंधळे, मुस्ताफ गफुर शेख, सुनिल सुरेश बेलकर, सहायक पोलीस उपनिरीक्षक दिलीप अंबादास फाटे. त्यानंतर पालकमंत्र्यांनी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, नागरिकांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. प्रविणा कन्नडकर यांनी सुत्रसंचालन केले.

# पर्यावरणीय बदलांबाबत करावयाच्या उपाययोजनांचा विभागनिहाय आराखडा तयार करा; जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- पर्यावरणीय बदल व त्यानुसार होणाऱ्या एकंदर वातावरण, आरोग्य, जैवविविधता, पीक पद्धती यात होणाऱ्या बदलांबाबत शासनाच्या विविध विभागांनी आपापल्या विभागाच्या उपाययोजना राबवावयाच्या आहेत. त्याचा जिल्ह्याचा आराखडा तयार करावा,असे निर्देश आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

राज्यातील अमृत शहरे, जिल्हे आणि महसूल विभागांमध्ये वातावरणीय कृती कक्ष स्थापन करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. त्यासंदर्भात आढावा आजच्या बैठकीत घेण्यात आला.



बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर,मनपा उपायुक्त स्वप्नील राठोड, माविमचे जिल्हा समन्वयक चंदनसिंग राठोड, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन संरखक संदीप गिरी, पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती एस.जी. शाहपुरे, सहा. वनसंरक्षक आशा चव्हाण, न.प. प्रशासन सहा. आयुक्त ऋषिकेश भालेराव, सिल्लोड मुख्याधिकारी भागवत बिघोत, फुलंब्री मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशीक संचालक अच्युत नांदवटे, इको सत्ता संस्थेच्या गौरी मिराज, वीज वितरण कंपनीचे मनिष ठाकरे, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे विभागीय अधिकारी अमित भामरे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील पर्यावरणीय बदल, हवा, पाणी, माती यावर त्याचे होत असलेले परिणाम, प्रदुषणामुळे आरोग्यावर होणाऱ्या परिणामांना प्रतिबंध करणे, त्यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी आराखडा द्यावयाचा आहे. त्यासाठी बैठक बोलावण्यात आली. त्यात प्रत्येक विभागाने आराखडा तयार करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी विल्हेवाट, जमिनीचे आरोग्य सुधारणे याबाबत उपाययोजनांचा ह्यात समावेश असावा,असेही सांगण्यात आले.

# नक्शा प्रकल्पः कन्नड शहरातील १०,३३६ मालमत्तांचे नकाशे तयार; जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा



छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- ‘नक्शा’ हा मालमत्तांचे डिजीटल उतारे देण्यासाठी राबविण्यात येणारा पथदर्शी प्रकल्प कन्नड शहरात (नगरपालिका हद्द) राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाचे सात टप्पे असून सहा टप्प्यांचे काम पूर्ण झाले आहे. त्यात १० हजार ३३६ मालमत्तांचे नकाशे तयार असून आता पुढील टप्प्यांच्या कामाला सुरुवात करण्यात येईल, अशी माहिती आज झालेल्या बैठकीत देण्यात आली.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज आढावा घेतला. जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख डॉ. विजय वीर, न.प. प्रशासन सहा. आयुक्त ऋषिकेश भालेराव, सहा. नगर रचनाकार हरीष गुडे, नगर रचना विभागाचे कौस्तुभ भावे आदी उपस्थित होते.

कन्नड शहरात राबविण्यात येणाऱ्या पथदर्शी प्रकल्पात प्रारंभीच्या टप्प्यात सर्व कामे पूर्ण झाली असून त्यात प्रामुख्याने तपासणी, मोजणी आदी कामे होती. त्यानुसार ड्रोनद्वारे शहराचे प्रतिमाकरणही झाले आहे. त्यानुसार मालमत्तांचे डीजीटल नकाशे तयार झाले आहेत. १० हजार ३३६ नकाशे असून या नकाशांचे प्रतिमा प्रमाणीकरणाचे काम आता पुढील टप्प्यात सुरु होईल, अशी माहिती डॉ. विजय वीर यांनी दिली. ही सर्व कामे वेळेत आणि समन्वयाने करावीत,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

# ‘संस्कार दशसूत्रीचे-रंग राष्ट्रभक्तीचे’ अंतर्गत जिल्ह्यात विश्वविक्रम

## १ लाख ८५ हजार विद्यार्थ्यांची देशभक्तीपर गितांवर सामुहिक कवायत






छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील तब्बल १ लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी एकाच सुरात महाराष्ट्र गीताचे समूहगान सादर करताना, देशभक्तीपर गीतांवर शिस्तबद्ध आणि समरस अशा सामूहिक कवायत संचलनातून राष्ट्रभक्तीची जिवंत अनुभूती दिली. विद्यार्थ्यांच्या आवाजात उमटलेले महाराष्ट्र गीत आणि त्यांच्या पावलांतून व्यक्त झालेली शिस्त, एकात्मता व देशप्रेम यामुळे संपूर्ण वातावरण भारावून गेले. प्रजासत्ताक दिनानिमित्त (सोमवार, दि.२६) या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम राबविण्यात आला. राज्यातील १ लाख शाळांमध्ये ७ लाख शिक्षक व २ कोटी विद्यार्थ्यांचा सहभाग होता. ‘संस्कार दशसुत्रीचे, रंग देशभक्तीचे’ या शिर्षकानंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. जिल्ह्यात १ लाख ५० हजार विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होतील असे नियोजन होते मात्र प्रत्यखात १ लाख ८५ हजार विद्यार्थी सहभागी झाल्याचे संयोजकांनी सांगितले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून सध्या सुरू असलेल्या दशसूत्री उपक्रमांतर्गत ‘राष्ट्रभक्ती जागृत करणे’ या महत्त्वपूर्ण सूत्राचा एक भाग आहे. विद्यार्थ्यांच्या सहभागातून राष्ट्रप्रेम केवळ शब्दांत नव्हे तर कृतीतून व्यक्त व्हावे, या मुख्य हेतूने हा कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत तालुका स्तरावर मुख्यालयासह विविध ठिकाणी शाळांमधील विद्यार्थी एकत्र येऊन एकाच देशभक्तीपर गीताच्या तालावर शिस्तबद्ध कवायत सादर करणार आली. शिस्त, समन्वय, संघभावना आणि राष्ट्रध्वजाप्रती आदर यांचे प्रभावी दर्शन या सामूहिक कवायत संचलनातून घडले.

या उपक्रमाची अधिकृत नोंद Asia Book of World Records आणि India Book of World Records या मान्यवर आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये करण्यात आली, ही गौरवास्पद बाब ठरली. जिल्ह्यात प्रत्येक तालुका मुख्यालयी तसेच जिल्हा मुख्यालयी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य सोहळा राजे संभाजी सैनिक विद्यालय, कांचनवाडी येथे आयोजीत करण्यात आला. या सोहळ्याला विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सौ. अश्विनी लाठकर तसेच विद्यार्थी, पालक आणि शिक्षक सहभागी होते. विक्रमाची नोंद करण्यासाठी श्रीमती रेखा सिंग या व त्यांची टीम उपस्थित होती.

शानदार कवायत नंतर जिल्ह्यातील विविध ठिकाणी कार्यक्रमाची व तेथील सहभागाची नोंद घेऊन मग विश्वविक्रमाची नोंद करण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना Asia Book of Records, तर शिक्षणाधिकारी (माध्य) अश्विनी लाठकर यांना India Book of Records पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. याचबरोबर, राज्यभरात शासकीय ध्वजारोहणानंतर एकाच वेळी अडीच कोटी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत संचलन सादर करत World Book of Records LONDON मध्ये नोंद करून एक भव्य विश्वविक्रम प्रस्थापित केला.

# राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम : योग्य प्रतिनिधीत्वासाठी मतदानाचा टक्का वाढणे आवश्यक- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- लोकप्रतिनिधीत्वा अधिनियमानुसार अपेक्षित लोकप्रतिनिधीची निवड करण्यासाठी आपण मतदान करतो. मात्र मतदानाची टक्केवारी कमी असल्यास कमी लोकांचा प्रतिनिधी आपण निवडतो. जास्तीत जास्त लोकांना प्रतिनिधी निवडण्यासाठी मतदानाचा टक्का अधिक असणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.



राष्ट्रीय मतदान दिवस (दि.२५) निमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा नियोजन भवनात हा कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात उपस्थितांना मतदारांची प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच इंडीयन इन्स्टिट्युट ऑफ फुड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थिनींनी मतदार जागृती संदर्भात पथनाट्य सादर केले. तसेच नव मतदारांना मतदान ओळखपत्राचे वितरण, ज्येष्ठ मतदार व महिला मतदारांचा सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, महिला मतदारांच्या मतदानाच्या टक्केवारीत वाढ होणे आवश्यक आहे. लोकांना मतदान हा अधिकार दिला आहे. आपण आपले अधिकार, हक्कांबाबत जागरुक असतो मात्र कर्तव्यासाठीही जागरुक व्हावे,असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक देवेंद्र कटके यांनी केले तर अनिता खुने यांनी आभार मानले.


**महावीर शिक्षण प्रसारक मंडळ**
**जायकवाडी (उ) ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर**
संचलित
**ओंकार मुकबधीर निवासी विद्यालय पैठण**
ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर शासन मान्य अनुदानीत

**पाहिजेत**

| अ.क्र. | पदनाम | जागा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | विशेष शिक्षक | ०१ | HSC, D.Ed.(HI) |

अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शासन मान्य अनुदानित शाळेवर रिक्त झालेल्या पदावर वरील जागा भरणे आहे. मुलाखतीस स्वखर्चाने मुळ कागदपत्रासह दिनांक ०२/०२/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०४.०० वाजेपर्यंत ओंकार मुकबधीर निवासी विद्यालय, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे मुलाखतीस हजर राहावे.

**स्वाक्षरीत** **सचिव** — **स्वाक्षरीत** **अध्यक्ष**



Truhome FINANCE
**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
**(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )**
**मागणी सूचना**
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइट:** http://www. truhomefinance.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात** ) कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.
कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| **कर्ज खाते क्रमांक.- SBTHAURD0000928 & STUHAURD0000932** **१. श्रीमती सुनिता जनार्दन निर्मल (कर्जदार)** **२. श्री. सुरज फुलचंद उमाप (सह-कर्जदार)** **3. श्री शुभम फुलचंद उमप (सह-कर्जदार)** **सध्याचा पत्ता: प्लॉट क्र. ११ ब छत्रपती नगर मल्हार चौक गारखेडा औरंगाबाद महाराष्ट्र भारत ४३१००९** **कर्जाची रक्कम – रुपये ६०,७६,५४१ /-** **कर्ज खाते क्रमांक.- SBTHAURD0000928** **कर्जाची रक्कम – रु. २५,९५,२७२/-** **कर्ज खाते क्रमांक.- STUHAURD0000932** **एनपीए तारीख – ०३/०१/२०२६** | सर्वे क्रमांक १९/२, प्लॉट क्रमांक ११ बी, क्षेत्रफळ १४३.१२ चौरस मीटर असलेल्या जमिनीचा संपूर्ण तुकडा. छत्रपती नगर, गरखेडा, तालुका व जिल्हा औरंगाबाद-४३१ ००९ येथे स्थित, ज्याची सीमा खालीलप्रमाणे आहे:- पूर्व: भूखंड क्रमांक १२ पश्चिम: भूखंड क्रमांक ११-ए दक्षिण: ५० फूट रुंद रस्ता उत्तर: भूखंड क्रमांक ०८ | मागणी सूचना तारीख: १९-०१-२०२६ दिनांक १२-०१-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. अनुक्रमे SBTHAURD0000928 आणि STUHAURD0000932, अंतर्गत रु. ६२,६५,७१७/- (बासष्ट लाख पासष्ट हजार सातशे सतरा रुपये फक्त) आणि रु. २६,९८,२०५/- (सव्वीस लाख अठ्याण्णव हजार दोनशे पाच रुपये फक्त) आतापर्यंत नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज आणि आनुषंगिक खर्च, खर्च इ. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - औरंगाबाद
दिनांक - २८-०१-२०२६
स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )



**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
**(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )**
Truhome FINANCE
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**मुख्य कार्यालय.** लेव्हल ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२ ब्लॉक,वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
**वेबसाइट:** www.truhomefinance.in

**भौतिक ताबा सूचना**

जसे की, निम्नस्वाक्षरीदार हे हे ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३(१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार/ सह-कर्जदार/तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.
कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि नियम ८ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा २०-०१-२०२६ रोजी भौतिक ताबा घेतला आहे.
कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे मालमत्तेशी व्यवहार करू नये अशी ताकीद देण्यात येत आहे आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लि) कडून येथे नमूद केलेल्यारकमेसाठी व्याजासह शुल्क आकारला जाईल.कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

| कर्जदाराचे नाव व पत्ता |
|---|
| **१) श्री.अशोक दिगंबर लब्दे (कर्जदार)** **२) सौ. रेखा अशोक लब्दे (सह-कर्जदार)** **सर्वांचा सध्याचा पत्ता : प्लॉट क्रमांक १५५, न्यू हनुमान नगर, मातोश्री नगर, सिडको कॉलनी, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१०१०** **तसेच: मालमत्तेचा पत्ता: गट क्रमांक १०६, प्लॉट क्रमांक १५, फ्लॅट क्रमांक १८, स्टिल्ट तिसरा मजला, क्षेत्रफळ ६९८ चौरस फूट, रेणुका अपार्टमेंट, मिळकत क्रमांक १३९७३, सातारा, औरंगाबाद, महाराष्ट्र -४३१०१०** |
| **थकबाकी रक्कम** |
| कर्ज खाते क्रमांक SHLHARGB0000083. च्या संदर्भात, दिनांक ०९-१२-२०२४ रोजीची रक्कम रु. ६,२१,७६८/- (रुपये सहा लाख एकवीस हजार सातशे अडुसष्ट फक्त) मागणी सूचना दिनांक: १६/१२/२०२४, भौतिक ताबा तारीख– २०/०१/२०२६ |
| **मालमत्तेचे वर्णन** |
| गट क्रमांक १०६, प्लॉट क्रमांक १५, फ्लॅट क्रमांक १८, स्टिल्ट तिसरा मजला, क्षेत्रफळ ६९८ चौरस फूट, रेणुका अपार्टमेंट, मिळकत क्रमांक १३९७३, सातारा, औरंगाबाद येथील संपूर्ण जमीन. आणि त्याच्या चतुःसीमा खालील प्रमाणे आहेत: पूर्व: फ्लॅट क्रमांक १५, पश्चिम: रस्ता, दक्षिण: रस्ता, उत्तर: फ्लॅट क्रमांक १७ |

ठिकाण - औरंगाबाद
दिनांक: २०.०१.२०२६
स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )